# विषय – आर्थीक साक्षरता

- विषय – ओळख व परीचय
- उद्देश –
    - समूहामध्ये वातावरण निर्मीती करणे
    - एकमेकांची ओळख व्हावी.
    - महिला बोलण्यास प्रवृत्त होतील

| सत्राचे नाव | आशय | पद्धती | प्रशिक्षण साहित्य | अपेक्षीत परीणाम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| ओळख परीचय | एकमेकींशी ओळख व्हावी व वातवरण मोकळे व्हावे. | खेळ – स्वत:च्या नावाला लागेल ते विशेषण घेउन. | – | महिला बोलण्यास तयारी होतील, वातावरण निर्मीती व समूहामध्ये ओळख होईल. | १५ मि. |

प्रथम प्रशिक्षणार्थींचे हसतमुखाने स्वागत करावे त्यानंतर समूहामध्ये वातावरण निर्मीती होण्यासाठी; एकमेकींची ओळख व्हावी व महिला बोलण्यास प्रवृत्त व्हाव्यात यासाठी खेळाचे माध्यमातून ओळख परीचयाचा विषय घेण्यात यावा. त्यानंतर :

- उपस्थित प्रशिक्षणार्थींना गोलाकारामध्ये उभे राहण्यास सांगावे.
- प्रत्येक प्रशिक्षणार्थींना मध्यभागी येउन स्वत:च्या नावाला साजेल असे विशेषण लावून त्यासंदर्भात २ मिनीटे माहिती देण्यास सांगावे. उदा. – पल्लवी – ***महिलांची आशा पल्लवीत करणारी !***
- प्रशिक्षकाने या पद्धतीने इतरांनाही स्वत:ची ओळख करून देण्याकरीता पुढे येण्यास सांगावे व तशी कृती करवून घ्यावी.

या सर्व कृतीतून समूह मोकळा होउन बोलण्यास व सहभागी होण्यास प्रवृत्त होईल.

## विषय / सत्राचे नाव – महिलांचे जीवनचक्र (सद्यस्थितीची जाणीव )

विषय – महिलांचे जीवनचक्र (सद्यस्थितीची जाणीव )

- उद्देश –
  - समूहातील महिलांना त्यांच्या जीवनतील परिस्थितीची जाणीव होईल.

| सत्राचे नाव | आशय | पद्धती | प्रशिक्षण साहित्य | अपेक्षीत परीणाम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| सद्यस्थितीची जाणीव | सावकारीचे परीणाम | भूमीका नाटय | – | महिला सद्यस्थितीची जाणीव होईल | ४५ मि. |
| परीस्थितीतील बदल | आर्थीक साक्षरतेमूळे झालेले सकारात्मक बदल | भूमीका नाटय | – | आर्थीक समावेशनामूळे झालेले सकारात्मक परीणाम | ४५ मि. |

वरील सत्र हाताळतांना प्रशिक्षणार्थींचे २ गट समान करून एका गटास 'सावकारापासून घेतलेले कर्ज व त्यामधून त्या महिलेची झालेली दयनीय अवस्था' या विषयावर त्या गटास भुमीका नाटय करण्यास सांगावे व दुस–या गटास 'आर्थीक घटकांचा वेगवेगळया माध्यमातून झालेला फायदा व त्यामूळे महिलेची सुधारलेली परिस्थिती' या विषयावर भूमीका नाटय तयार करण्यास सांगावे. त्यानंतर :

- उपस्थित महिलांव्दारा प्रशिक्षकाने १...२.... असे आकडे म्हणवून २ गट तयार करणे.
- प्रत्येक गटातील १ गटनेता तयार करणे.
- दोन्ही गटास विषयाची संकल्पना प्रशिक्षकांनी समजावून सांगावी.
- पुर्वतयारी करण्यासाठी गटाला १५ मिनीटाचा कालावधी दयावा.
- प्रत्यक्ष सादरीकरण करायला लावणे.

- ➢ सादरीकरणा दरम्यान उर्वरीत प्रशिक्षणार्थींना भूमीका नाटय पाहण्यास सांगावे व त्यासंदर्भात त्यांनी आपल्या विचारप्रक्रीयेकडे लक्ष देण्यास प्रवृत करावे / सांगावे.
- ➢ दुस–या गटाने त्यांच्या विषयानूसार भूमीका नाटय सादर करावे व त्यासंदर्भात उर्वरीत महिलांनी आपल्या विचारप्रक्रीयेकडे लक्ष देण्यास प्रवृत करावे / सांगावे.

सादरीकरणानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना एकत्रीत बसण्यास सांगावे व दोन्ही गटातील विषयांवर चर्चा करून मुद्दयाची मांडणी करण्यास सांगावी.

| गट क्रमांक १ चे मुद्दे<br>**‘सावकारापासून घेतलेले कर्ज व त्यामधून त्या महिलेची झालेली दयनीय अवस्था’** | गट क्रमांक २ चे मुद्दे<br>**‘आर्थीक घटकांचा वेगवेगळया माध्यमातून झालेला फायदा व त्यामूळे महिलेची सुधारलेली परिस्थिती’** |
|---|---|
| माहितीचा अभाव | धोका पत्करण्याची तयारी |
| अशिक्षीतपणा | आर्थिक सेवांची माहिती |
| नियोजनाचा अभाव | नियोजन चांगले |
| उत्पन्न वाढीसाठी कर्जाचे योग्य उपयोग न करणे | आवश्यक व अनावश्यक गरजांची चांगली समज |
| गरीबीत अधिक वाढ | पुढाकार वृत्ती |
| कौशल्यांचा अभाव | हितसंबंध जोपासण्याचे कौशल्य |
| व्यसनाधिनतेचा परीणाम | |
| | |

वरील मुद्दे व प्रशिक्षणार्थीकडून येणारे मूद्दे यावर प्रशिक्षकाने चर्चा घडवून उपरोक्त दोन मुद्दे प्रशिक्षणार्थींना समजावून देणे

## विषय / सत्राचे नाव – आर्थिक साक्षरतेची तोंडओळख व सेवांची माहिती

उद्देश –

- महिलांना आर्थिक साक्षरतेची संकल्पना स्पष्ट होईल.
- आर्थिक सेवांची माहीती होईल.
- प्रशिक्षणानंतर महिला स्वत:च्या कुटुंबांचे आर्थिक नियोजन करण्याबाबतची स्पष्टता येईल.

| **सत्राचे नाव** | **आशय** | **पद्धती** | **प्रशिक्षण साहित्य** | **अपेक्षीत परीणाम** | **वेळ** |
|---|---|---|---|---|---|
| आर्थीक साक्षरतेची तोंडओळख व सेवांची माहिती | आर्थीक साक्षरतेची माहिती व्हावी व त्यांना सेवांची माहिती व्हावी. | व्याख्यान, गटचर्चा , प्रश्नावली, गंगाजमूना फिल्म | चार्टपेपर्स, पेन, प्रश्नावली, व्हाईट बोर्ड, मार्कर, संगणक व प्रोजक्टर इ. | आर्थीक सेवा व त्यापासून मिळणारा सकारात्मक लाभ याची माहिती मिळेल व प्रशिक्षणानंतर महिला स्वत:च्या कुटुंबांचे आर्थिक नियोजन करण्यास सुरूवात करतील. | ६० मि. |

सत्र क्र. १

गंगाजमूना लघूचित्रपट दाखवणे व गटचर्चा

उद्देश –

- महिलांना आर्थिक साक्षरतेची संकल्पना स्पष्ट होईल.
- महिलांना बचतीचे महत्व समजेल.

गंगाजमूना लघूचित्रपट दाखविण्यात येईल त्यानंतर :
सर्व सहभागी महिलांचे ५ गट तयार करण्यात येतील व त्यामध्ये पुढील विषय गटचर्चेसाठी देण्यात येतील.

**विषय —**

- ✓ गंगा बनावयाचे आहे की जमूना ?
- ✓ गंगा बनायचे तर का? जमूना बनायचे नाही तर का?
- ✓ गंगाची प्रगती का झाली?
- ✓ सावकाराने जमूनाच्या घरातील सामान उचलून का नेले?

वरील ४ मुद्दयांव गटात १० मिनीटे चर्चा करण्यास सांगणे व गटातील नेत्याने त्याचे सादरीकरण करणे आवश्यक आहे. यामूळे महिलांना काय बोध मिळाला? व त्यांना बचतीचे महत्व कितपत समजले याविषयीची माहिती प्रशिक्षकाला समजेल. यावर आधारीत प्रशिक्षकाने सादरीकरण झाल्यावर एकत्रीत विषयाचा सार महिलंाना समजावून सांगणे.

**अपेक्षीत साध्य —**

१. महीलांना बचतीचे महत्व समजेल.
२. कर्ज घेण्याची प्रक्रीया व महत्व समजेल.
३. कर्जाचा उपयोग कसा करायचा हे लक्षात येईल.
४. कर्ज परतफेडीमूळे वाढलेली पत

**आर्थीक साक्षरता म्हणजे काय ?**

आपल्याकडे असलेल्या संसाधनांचा प्रभावी उपयोग करून स्वत:ची आर्थिक सुरक्षीतता वाढविणे म्हणजे आर्थिक साक्षरता होय. साक्षरता म्हणजे लिहीता वाचता येणे ही सर्वमान्य संकल्पना आहे त्याचप्रमाणे आर्थिक साक्षरता म्हणजे आपल्याकडे जमा रक्कम व आपला एकूण खर्च याचा ताळमेळ घालून सुरक्षीत आर्थिक परिस्थिती निर्माण कशी होउ शकते याची समज वाढविणे होय. अनेकवेळा असे ध्यानी येते की आपण आपल्या उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करतो. त्यामूळे गरजा भागविण्यासाठी कर्ज काढावे लागते. कर्जाच्या व्याजाचा बोजा वाढतो. थोडक्यात कर्जाच्या विळख्याला सूरूवात होते. काही वेळेला असे दिसते की आपण आपल्या उत्पन्नानूसार बेताने खर्च करतो परंतू आकस्मिक परिस्थिती उद्‌भवते उदा. आजारपण, नैसर्गिक आपत्ती इ. त्यासाठी तरतुद केलेली नसल्याने उद्‌भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेतांना पैसा जमवावा लागतो. अशावेळी कर्जही कावे लागते व त्यातूनकही गरिबीचे चक्र सुरू होउ शकते. त्यामूळे आर्थिक साक्षरता ही आपल्या सर्वांच्या दैनंदिन आयूष्याशी निगडीत असलेली संकल्पना आहे आपण समजून घेउ या.

**आर्थिक साक्षरता कशासाठी केली पाहीजे?**

१. गरिबीच्या चक्रातून बाहेर येउन स्वत:च्या पायावर उभे करणे.
२. मुलभूत गरजा भागवण्यासाठी आर्थिक नियोजन करणे.
३. विवेकपूर्वक खर्च करणे
४. बचतीचे महत्व समजून घेउन बचत करणे
५. भविष्यकालीन गरजा ओळखून त्याकरीता विशेष तरतुदी करून ठेवणे.

**आर्थिक साक्षरता कशाप्रकारे करावी?**

१. कुटुंबात काम करणा–या लोकांचे उत्पन्न व खर्च यांचे नियोजन
२. उत्पन्न लक्षात घेउन गरजा ठरविणे
३. अनावश्यक खर्च टाळणे
४. बचतीत वाढ करणे
५. योग्यप्रकारे गुंतवणूक करणे
६. कुटूंबातील सर्व व्यक्तिंचा व उदयोगाचा विमा काढणे
७. उदयोग व्यवसाय करणे

**आर्थिक साक्षरता घडविण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल?**

१. महिलांच्या सर्वसाधारण निर्णय प्रक्रियेमध्ये आर्थिक व्यवस्थापनाचा विचार रूजविणे.
२. महिला भविष्यासाठी नियोजन करण्यास प्रव्‌त्त करणे, मानसिकतेत बदल करणे.
३. आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यावरील गरजा कोणत्या आहेत याची जाणीव करून देणे व त्याला सामोरे जाण्यासाठी त्यांची तयारी करणे – आर्थिक सुरक्षिततेची भावना वाढीस लावणे.
४. 'आपण गुंतवणूक करीत असलेला प्रत्येक रूपया हा फक्त वर्तमान नव्हे तर भविष्यातही नक्की उपयोगी पडू शकतो' हा विश्वास प्रत्येक महिलेला देण व त्यासाठी नियोजन व गुंतवणूक या दोन बाबीवर भर देण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे.

सत्र क्र. २ –

बचतीच्या विविध सेवांची माहिती देणे

उद्‌देश –

✓ महिलांना विविध बचतीच्या सेवांची माहिती मिळेल.

यामध्ये बचतीच्या विविध सेवांची माहिती पोहोचवण्यासाठी महिला बचत गटात बचत करतात परंतू भविष्यातील गरजांचा विचार करून त्यानूसार जास्तीची बचत कशाप्रकारे करावी याविषयीचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल.

**बचत म्हणजे काय? याविषयी प्रशिक्षणार्थींशी सूरूवातीला ५ मिनीटे चर्चा करून नंतर प्रशिक्षकाने पुढील बचतीची संकल्पना स्पष्ट करावी.**

१. बचत म्हणजे दैनंदिन गरजा पूर्ण करून राहिलेली शिल्लक रक्कम होय.

२. अनावश्यक खर्च टाळून रक्कम वाचवणे म्हणजे बचत होय.

परंतू भविष्यकालीन गरजा लक्षात घेउन त्याकरीता आतापासून केलेली बचत म्हणजे विशेष बचत होय. यामध्ये मूलामुलींचे शिक्षण, लग्न , घर, आजारपण इत्यादी. या गरजा पूर्ण करण्यासाठी विचारपूर्वक तरतूद करणे आवश्यक आहे यासाठी सूरक्षीत मार्गाने बचत करावी यानुषंगाने महिलांना मार्गदर्शन करणे गरजेचे ठरते. त्याकरीता बचतीचे विविध मार्ग पुढीलप्रमाणे :

**१. आर्थीक बचतीचे विविध मार्ग –**

⟹ **विमा –** जीवन विमा, जनरल विमा, पशूधन, वाहन, शेती, साधनसामुग्री, घर, आरोग्य इ.

⟹ **पोस्ट –** रिकरींग डिपॉझीट, मुदत ठेव, राष्टीय बचत प्रमाणपत्र वीमा, बचत.

⟹ **बॅंक** – बचत, रिकरींग डिपॉझीट, मुदत ठेव, वीमा.

⟹ **सार्वजनीक भविष्य निर्वाह निधी –** पी. पी. एफ. (EPF)

⟹ इतर – सोने, चांदी, जमीन, पशुधन इ.

**२. बचतीचे अन्य मार्ग – ज्याकरीता अतिरिक्त पैसा गुंतवण्याची गरज नाही –**

⟹ आवश्यक तेवढाच स्वयंपाक बनविणे

⟹ व्यसनावरील खर्च कमी

⟹ गरजेपेक्षा अधिक सौंदर्य प्रसाधने, कपडे खरेदी न करणे.

⟹ आरोग्याची काळजी घेणे.

⟹ किरकोळ खरेदीपेक्षा घाउक खरेदीला प्राधान्य देणे.

यामध्ये प्रशिक्षणार्थीकडून मूद्दे चर्चेत घेउन बचतीचे विविध मार्ग प्रशिक्षणार्थींना समजावून सांगणे.

**३. अल्पकालीन, मध्यमकालीन व दिर्घकालीन गरजांचा शोध व नियोजन –**

उद्देश – महिलांना स्वत:च्या व कुटुंबांच्या गरजांचा शोध घेउन नियोजन करणे.

या सत्रामध्ये प्रशिक्षकाने एका व्यक्तिची निवड करून त्यांना त्यांची स्वप्ने व गरजा बघण्यास प्रवृत्त करावे व येणा–या गरजांची यादी उपलब्ध साहित्याचा उपयोग करून तयार करावे त्यानंतर तयार झालेल्या यादीतून अल्पकालीन, मध्यकालीन व दिर्घकालीन गरजांची यादी करावी.

त्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना वरील पद्धतीने व्यक्तिगत कृती करायला सांगावे व करवून घेणे.

**४. कुटूंबाचे आर्थीक नियोजन कशाप्रकारे करावे –**

**उद्‌देश –** प्रशिक्षणानंतर महिला स्वत:च्या कुटुंबांचे आर्थिक नियोजन करण्याबाबतची स्पष्टता येईल.

महिलांच्या रोजच्या जीवनातील उदाहरण घेउन आर्थिक नियोजन कशाप्रकारे करावे याबाबत मार्गदर्शन करणे याबाबत प्रशिक्षकाने एका प्रशिक्षणार्थीला मॉडेल म्हणून निवडावे व त्यांच्याशी चर्चा करून खालील बाबी उपलब्ध साधनसामूग्रीचा वापर करून सर्वांना लक्षात येईल असे लिहावे.

⟹ मासीक जमाखर्च याची माहिती

| जमा | खर्च | नियोजन |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

खालील उदाहरण :

भागाबाई शिंदे यांच्या कुटूंबात त्यांच्या पतीसह २ मूली व १ मूलगा, आईवडील अशा ७ जणांचा समावेश आहे व वडीलांच्या नोकरीचे मासीक उत्पन्न रूपये ५००० असून १ एकर जमीन आहे. त्यांचे ३ मुलं शिकत असून अनूक्रमे १०, ८ व ५ वी मध्ये शिकत आहेत. त्यांचे आईवडील वयस्कर आहेत. त्यांचेकडे कोणतेही दुसरे आर्थीक उत्पन्नाचे सादर नाही.

**वार्षीक जमा खर्च पत्रक (अंदाजे):**

| जमा | खर्च | नियोजन |
|---|---|---|
| शेतीतील निव्वळ नफा रू. २५००० | दैनंदीन खर्चासाठी रू. ३६००० | मुलामुलींचे शिक्षण ५०००/– |
| नोकरीचे उत्पन्न रू. ५००० x १२ महिने = ६०००० | आजारपण रू. १०००० | घर दूरूस्ती २००००/– |
| | कपडे रू. ५००० | |
| | लग्न समारंभ रू. ५००० | |
| | सण समारंभ रू. ४०००/– | |

| | | |
|---|---|---|
| एकूण जमा ८५०००/— | एकूण खर्च ६००००/— | नियोजन २५०००/— |

वरील उदाहरणावरून असे दिसून येते की या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रू. ८५०००/— असून वार्षिक खर्च रू. ६००००/— आहे. इतर कोणत्याही प्रकारची बचत केलेली दिसून येत नाही. पुढील नियोजन केलेले असून त्याकरीता २५०००/— रक्कम बाजूला काढलेली आहे मात्र शेतीत उत्पन्न आले नाही, किंवा आलेल्या घटनांकरीता तरतूद केलेली नाही तसेच बाजूला ठेवलेले रू. २५०००/— बॅकेत F.D. मध्ये आहे ज्यावर व्याज फक्त 8% (वार्षिक) आहे. यापेक्षा SMART गुंतवणूक कोणती असु शकते याचा विचार कुटुंबाने केलेला नाही. तसेच भविष्यकालीन गरजांसाठी पैसा कधी (किती महिण्यांनी, वर्षांनी) लागणार आहे याचे नियोजन केल्यास गुंतवणुकीचा मार्ग ठरवता येउ शकतो.

अशाप्रकारे उपस्थित प्रशिक्षणापैकी एका महिलेच्या कुटुंबाचे उदा. घेउन महिला आर्थिक नियोजन कशाप्रकारे व का करावे याबाबत माहिती देण्यात यावी. याकरीता महिला चित्राच्या माध्यमातुन माहिती देणे जास्त सोयीचे होईल. उत्पन्न व खर्च या दोन्हींचा ताळमेळ बसला नाही की महिला कर्जाकडे वळतात पण घेतलेल्या कर्जाचा सातत्याने उत्पादकीय कार्यासाठी उपयोग केला गेला नाही तर फक्त उपभोग खर्चासाठी उपयोग केला तर मात्र ते कुटुंब अधोगतीकडे जाउ शकते याकरीता कर्जाचा व्यवस्थितरित्या वापर यावरही या सत्रात चित्र माध्यमातुन माहिती देणे आवश्यक आहे.

(संदर्भ पूस्तिका — माविम )